जा.क्रं.एसएसएस/वशी/मंदिर/1887/२०२४
दि. 19 OCT 2024

**विषय:- कार्तिक एकादशी व तुलसी विवाह कार्यक्रम-२०२४चे नियोजनाबाबत....**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत कार्तिक शु.॥११ मंगळवार, दि.१२/११/२०२४ रोजी "**कार्तिक एकादशी**" (प्रबोधिनी एकादशी) हा स्थानिक उत्सव साजरा करण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**- कार्तिक एकादशी कार्यक्रम –**

**वार:- मंगळवार तिथी:- कार्तिक शु. ॥११ दि.१२/११/२०२४**

| अ.क्र. | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|
| ०१ | सायंकाळी ०६.००वा | धुपारती सुरु होईल. |
| ०२ | रात्रौ ०८.०० ते ०९.०० वा. | किर्तन कार्यक्रम |
| ०३ | रात्रौ ०९.१५ ते १०.३० वा (अंदाजे) | श्रींचे पालखीचे गावातुन मिरवणूक |
| ०४ | रात्रौ गावातून पालखी मिरवणूक परत आल्यानंतर श्रींची शेजारती सुरु होईल. | |

---

तसेच प्रतिवर्षाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत कार्तिक शु.॥१२ बुधवार, दि.१३/११/२०२४ रोजी "**तुलसी विवाह**" हा स्थानिक उत्सव साजरा करण्यात येतो. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**-तुलसी विवाह कार्यक्रम-**

**वार:-बुधवार तिथी:- कार्तिक शु.॥ १२ दि.१३/११/२०२४**

| अ.क्र. | वेळ | कार्यक्रम |
|---|---|---|
| ०१ | सायंकाळी ०६.०० वा | धुपारती सुरु होईल. |
| ०२ | सायंकाळी धुपारतीनंतर | तुलसी विवाह (श्रीव्दारकामाईत) |
| ०३ | रात्रौ १०.०० वा | श्रींची शेजारती सुरु होईल. |

**आदेश-**

उपरोक्त नमूद केलेल्या स्थानिक उत्सवामधील कार्यक्रमाकरीता खालीलप्रमाणे नियोजन करणे आवश्यक आहे. त्याकामी खाली दर्शविल्याप्रमाणे विभागाकडुन कार्यवाही करणेत यावी-

| अ.क्र. | कार्यवाही तपशील | विभाग |
|---|---|---|
| ०१ | मंगळवार, दि.१२/११/२०२४ रोजी कार्तिक एकादशी निमित्त कीर्तन, पालखी यांचे नियोजन करणेस व बुधवार, दि.१३/११/२०२४ रोजी तुलसी विवाह कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात करणेत यावी. | मंदिर विभाग |
| ०२ | १) कार्तिक एकादशी व तुलसी विवाह कार्यक्रमाचे स्वरुप/ कार्यक्रमाची माहिती मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे-मा.अध्यक्ष व सदस्य तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्य कार्यकारी, मा.मुख्य लेखाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांना दुरध्वनीवरुन कार्यक्रमाची माहिती व निमंत्रण देणेत यावे.<br>२) कार्तिक एकादशी व तुलसी विवाह कार्यक्रमाचे फोटोग्राफी व व्हिडीयो शुटींग करणेत यावी. | जनसंपर्क विभाग |
| ०३ | कार्तिक एकादशीनिमित्त पालखी मिरवणूकीकरिता व तुलसी विवाह प्रित्यर्थ द्वारकामाई येथे तुलसी विवाह कार्यक्रमासाठी ध्वनिक्षेपण व्यवस्था उत्तम ठेवावी. | ध्वनीक्षेपण विभाग |
| ०४ | १) मंगळवार, दि.१२/११/२०२४ रोजी कार्तिक एकादशीचे निमित्त श्रींचे शिरडी माझे पंढरपुर, माध्यान्ह आरती व धुपारतीचे वेळी लागणारे इतर नेहमीचे हारासोबत प्रत्येकी एक मोठा तुळशीचा हार श्रींचे गळयात व घालणेसाठी समाधीकरिता पाठविण्यात यावा. तसेच कार्तिक एकादशी निमित्त प्रत्येक मंदिरास आंब्याचे तोरणे बांधुन देण्यात यावीत.<br>२) बुधवार, दि.१३/११/२०२४ रोजी सायंकाळी ०६.४० वाजेच्या दरम्यान श्रीव्दारकामाई मंदिरात तुलसी विवाह कार्यक्रम मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे शुभहस्ते पूजन करण्यात येणार असल्याने, तुलसी विवाहकरीता एक मोठी तुळस कुंडीसह देण्यात यावी. तसेच श्रीव्दारकामाईत आंब्याच्या पानांची तोरण, ऊस व आवश्यक ठिकाणी फुलांची सजावट करणेत यावी. | बगीचा विभाग |

पान नं.०२ वर...

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>कार्यवाही तपशील</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>०५</td><td>मंगळवार, दि.१२/११/२०२४ रोजी कार्तिक एकादशी असल्याने श्रींचे माध्यान्ह आरती व शेजारतीनंतर प्रसाद वाटणेकामी शेंगदाणा व साखर कुट खालीलप्रमाणे तयार करुन वेळेपुर्वी मंदिर विभागास पुरविणेत यावे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>तपशील</th><th>माध्यान्ह आरती</th><th>शेजारती</th><th>एकुण किलो</th></tr>
<tr><td>०१</td><td>शेंगदाणे</td><td>०८ किलो</td><td>०८ किलो</td><td>१६ किलो</td></tr>
<tr><td>०२</td><td>साखर</td><td>०४ किलो</td><td>०४ किलो</td><td>०८ किलो</td></tr>
<tr><td></td><td>एकुण -</td><td>१२ किलो</td><td>१२ किलो</td><td>२४ किलो</td></tr>
</table>
</td><td>साईप्रसादालय विभाग</td></tr>
<tr><td>०६</td><td>मंगळवार, दि.१२/११/२०२४ रोजी श्रींच्या पालखीची मिरवणूक शिर्डी गावातून काढण्यात येते. पालखी मिरवणूकीचा मार्ग दुरुस्ती करणे/ साफ करणे, अडथळे काढुन घेणे इ. कामे तात्काळ करण्यात यावे.</td><td>बांधकाम विभाग</td></tr>
<tr><td>०७</td><td>कार्तिक एकादशी पालखीचे मिरवणूकीचे वेळी चोख बंदोबस्त ठेवावा व वेळेत पालखी समाधी मंदिरात येईल याची दक्षता घेण्यात यावी. तसेच नगरपरिषदेला पत्र देऊन पालखी मार्गातील अनाधिकृत अडथळे, वाहने, बांधकामाचे साहित्य, अतिक्रमणे काढण्यास सूचित करणेस मान्यता असावी. तसेच तुलसी विवाह कार्यक्रम द्वारकामाईत असल्याने सायंकाळी धुपारतीपासून ते तुलसी विवाह पूर्ण होईपर्यंत याठिकाणी चोख बंदोबस्त ठेवावा.</td><td>संरक्षण विभाग</td></tr>
<tr><td>०८</td><td>मंगळवार,दि.१२/११/२०२४ रोजी कार्तिक एकादशी कीर्तन,पालखी मिरवणूकीचे वेळी व बुधवार,दि.१३/११/२०२४ रोजी द्वाराकामाई येथे तुलसी विवाह कार्यक्रमाकरीता आकर्षक विद्युत रोषणाई करणे.</td><td>विद्युत विभाग</td></tr>
</table>

तरी उपरोक्तप्रमाणे संबंधीत विभागाने नेमून दिलेली कार्यवाही चोखपणे पार पाडावी.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी-

०१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.
०२. मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक
०३. मा.सर्व प्रशासकीय अधिकारी
०४. सर्व संबंधीत विभाग प्रमुख /अधिक्षक .
०५. स्थळ प्रत